# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

# जिल्हा पोलीस राजपत्र

## दि - 06.11.2018

# भाग 1 - बदली /नेमणूक /पदोन्नती

## निरंक

# भाग 2 - रजा

क्रमांक -सआली-२/परिवर्तीत रजा/पोकॉ-९८०/२०१८/12967 यवतमाळ, दिनांक- 6 OCT 2018

**आदेश**

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा नमुद हे आज दि.०५.०५.२०१८ रोजी सिक मधुन कर्तव्यावर हजर होणेकरीता आले आहे तरी यांना हजर करुण घेण्यात येत आहे. व नमुद वैद्यकीय कालावधी हा म.ना.से रजा नियम १९८१ चे नियम क्रमांक (६१) चे अधिन राहुन खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचारी नाव/पद/बनं | नेमणुक | मंजूर वैद्यकीय कालावधी |
|---|---|---|---|
| १ | पोकॉ/९८० अजय निंबोळकर | स्थागुशा यवतमाळ | दि.२०.०९.२०१८ ते दि.०५.१०.२०१८ पावेतो एकुण १५ दिवस परिवर्तीत रजा |

(मुकुंद कुलकर्णी)
प्र.पोलीस उपअधिक्षक (मुख्या)
यवतमाळ

# भाग 3 - वेतन/भत्ते / शैक्षिकरण

14J33

क्र.पोअय/प्रलि/८०-सी/सु.वे.नि./पोउपनि-विजय ढाके/ /२०१८ यवतमाळ, दि. - 6 NOV 2018

**आदेश**

पोलीस उपनिरीक्षक/विजय जनार्दन ढाके, नेमणूक, नियंत्रण कक्ष, जि.यवतमाळ हे यवतमाळ जिल्हा येथे पोलीस हवालदार /सहायक पोलीस उप निरीक्षक या मूळ पदावर कार्यरत असतांना त्यांची दि.२६/०८/२००८ रोजी पोस्टे.घाटंजी (नक्षलग्रस्त भाग) येथे नेमणूक करण्यात आली. श्री.ढाके हे पोस्टे.घाटंजी (नक्षलग्रस्त भाग) येथे दि.२६/०८/२००८ ते ०१/०९/२००८ पर्यंत पोलीस हवालदार ते सहायक पोलीस उप निरीक्षक पदी एक टप्पा पदोन्नतीवर तसेच दि.०२/०९/२००८ ते ३०/०९/२०१३ पर्यंत सहायक पोलीस उप निरीक्षक ते पोलीस उप निरीक्षक या पदात एक टप्पा पदोन्नतीवर व त्यानंतर दि.०१/१०/२०१३ ते ३१/०५/२०१४ पर्यंत पोलीस उप निरीक्षक ते सहायक पोलीस निरीक्षक या पदात एक टप्पा पदोन्नतीवर कार्यरत होते. तेथे त्यांना खालील नमूद **स्तंभ-अ** प्रमाणे वेतन अदा करण्यात येत होते. नक्षलग्रस्त क्षेत्रातुन त्यांची पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नतीवर नियंत्रण कक्ष, यवतमाळ येथे मूळ घटकात बदली झाल्याने त्यांची वेतन पडताळणीचे अधीन राहून खालीलप्रमाणे **स्तंभ-ब** प्रमाणे सुधारित वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

वेतनश्रेणी :- पोलीस हवालदार :- रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२५००/-
सहायक पोलीस उप निरीक्षक रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२८००/-
पोलीस उप निरीक्षक :- रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४३००/-
सहायक पोलीस निरीक्षक :- रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४४००/-

१.दि.०१/०७/२००८ पो.हवालदार पदाचे विद्यमान वेतन : रु.१०४१०/- ग्रेड वेतन रु.२५००/-**(मूळ पदातील वेतन)**
२.दि.२६/०८/२००८ सहा.पो.उप निरीक्षक पदावरील विद्यमान वेतन : रु.१०८००/- ग्रेड वेतन रु.२८००/-(एक टप्पा पदोन्नतीवरील)
३.दि.०२/०९/२००८ सहा.पो.उप निरीक्षक पदावरील विद्यमान वेतन : रु.१०८००/- ग्रेड वेतन रु.२८००/-(नियमित पदोन्नतीवरील)
४.दि.०२/०९/२००८ पो.उप निरीक्षक पदावरील विद्यमान वेतन : रु.११२१०/- ग्रेड वेतन रु.४३००/-(एक टप्पा पदोन्नतीवरील)
५.दि.०१/१०/२०१३ पो.उप निरीक्षक पदावरील विद्यमान वेतन : रु.१३७००/- ग्रेड वेतन रु.४३००/-(नियमित पदोन्नतीवरील)
६. दि.०१/१०/२०१३ सहायक पो.निरीक्षक पदावरील विद्यमान वेतन : रु.१४२४०/- ग्रेड वेतन रु.४४००/-(एक टप्पा पदोन्नतीवरील)

**भाग-१**

| स्तंभ-अ | | | स्तंभ-ब | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | एकस्तर पदातील वेतन | | वेतनवाढीचा दिनांक | मूळ पदातील वेतन | |
| | वेतनबॅण्ड | ग्रेड वेतन | | वेतनबॅण्ड | ग्रेड वेतन |
| ०१/०७/२००८ | १०४१०/- | २५००/- | ०१/०७/२००८ | १०४१०/- | २५००/- |
| २६/०८/२००८ | १०४१०+३९०=१०८०० नक्षलग्रस्त भागात नेमणूक (एक टप्पा पदोन्नती) | २८००/- | २६/०८/२००८ | १०४१०/-(काल्पनिक) | २५००/- |
| ०२/०९/२००८ | १०८००+४१०=११२१० (सपोउपनि पदी नियमित पदोन्नती झाल्याने पोउपनि या एकटप्पा पदावर निश्चित केलेले वेतन) | ४३०० | ०२/०९/२००८ | १०४१०+३९०=१०८०० (सपोउपनि पदी काल्पनिक वेतननिश्चिती) | २८००/- |
| ०१/०७/२००९ | ११६८०/- | ४३००/- | ०१/०७/२००९ | १०८००+४१०=११२१०/- (काल्प.वेतनवाढ) | २८००/- |
| ०१/०७/२०१० | १२१६०/- | ४३००/- | ०१/०७/२०१० | ११२१०+४२०=११६३०/- (काल्प.वेतनवाढ) | २८००/- |
| ०१/०७/२०११ | १२६६०/- | ४३००/- | ०१/०७/२०११ | ११६३०+४४०=१२०७०/- (काल्प.वेतनवाढ) | २८००/- |
| ०१/०७/२०१२ | १३१७०/- | ४३००/- | ०१/०७/२०१२ | १२०७०+४५०=१२५२०/- (काल्प.वेतनवाढ) | २८००/- |
| ०१/०७/२०१३ | १३७००/- | ४३००/- | ०१/०७/२०१३ | १२५२०+४६०=१२९८०/- (काल्पनिक वेतनवाढ) | २८००/- |
| ०१/१०/२०१३ | १३७००+५४०=१४२४०/- (पोउपनि पदी नियमित पदोन्नती झाल्याने सपोनि या एकटप्पा पदावर निश्चित केलेले वेतन) | ४४००/- | ०१/१०/२०१३ | १२९८०+४८०=१३४६० (पोउपनि पदी काल्पनिक वेतननिश्चिती) | ४३००/- |
| दि.३१/०५/२०१४ म.नं.पासून मूळ घटकात परतल्याने दि.०१/०६/२०१४ पासून रु.१३४६०/- ग्रेड वेतन रु.४३००/-प्रमाणे वेतन घेतील. | | | | | |

**भाग-२**

श्री.विजय जनार्दन ढाके यांची सहायक पोलीस उप निरीक्षक ते पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नतीवर दि.०१/१०/२०१३ पासून नियमित पदोन्नती झाली. पोउपनि पदी पदोन्नतीवर त्यांना **स्तंभ-अ** प्रमाणे यापूर्वी देण्यात आलेल्या वेतनवाढीमध्ये तफावत असल्याचे आढळून आल्याने त्यांची खालील नमूद **स्तंभ-ब** मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारित वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

| मूळ आदेश | | | सुधारित आदेश | | |
|---|---|---|---|---|---|
| वे.वाढ दिनांक | वेतन | ग्रेड पे | वे.वाढ दिनांक | वेतन | ग्रेड पे |
| ०१/१०/२०१३ | १३४६०/- | ४३००/- | ०१/१०/२०१३ | १३४६०/- | ४३००/- |
| ०९/०६/२०१४ | १४१४०/- | ४३०० | ०९/०६/२०१४ | १३४६०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१४ | १४१४०/- | ४३००/- | ०१/०७/२०१४ | १३४६०+५४०=१४०००/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१५ | १४७००/- | ४३००/- | ०१/०७/२०१५ | १४०००+५५०=१४५५०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१६ | १५२७०/- | ४३००/- | ०१/०७/२०१६ | १४५५०+५७०=१५१२०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१७ | १५८६०/- | ४३००/- | ०१/०७/२०१७ | १५१२०+५९०=१५७१०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१८ | १६४७०/- | ४३००/- | ०१/०७/२०१८ | १५७१०+६००=१६३१०/- | ४३००/- |

( एम. राज कुमार )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ.

14334

क्र.पोअय/प्रलि/८०-सी/सु.वे.नि.पोहवा-ग्रेड पे/सपोउपनि/-विजय ढाके/ /२०१८ यवतमाळ, दि. - 6 NOV 2018

**आदेश**

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेपूर-२०१७/प्र.क्र.१२/सुधारणा-८७/सेवा-९, दिनांक १९/०५/२०१७ अन्वये पोलीस विभागातील पोलीस हवालदार यांचे ग्रेड वेतनात सुधारणा करण्यात आली आहे. पूर्वीचे ग्रेड वेतन रु.२४००/-मध्ये सुधारणा करुन सुधारित ग्रेड वेतन रु.२५००/- करण्यात आले असल्याने सहायक पोलीस उपनिरीक्षक/विजय जनार्दन ढाके (सध्या पोलीस उप निरीक्षक) नेमणूक, नियंत्रण कक्ष, जि.यवतमाळ यांचे वेतनात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**वेतन संरचना**

पोलीस पोलीस नाईक :- ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/-
पोलीस हवालदार (विद्यमान वेतन संरचना):-५२००-२०२०० ग्रेड पे २४००/-
पोलीस हवालदार (सुधारित वेतन संरचना):-५२००-२०२०० ग्रेड पे २५००/-
सहायक पोलीस उप निरीक्षक :-५२००-२०२०० ग्रेड पे २८००/-

| मूळ आदेश | | | सुधारित आदेश | | |
|---|---|---|---|---|---|
| वे.वाढ दिनांक | वेतन | ग्रेड पे | वे.वाढ दिनांक | वेतन | ग्रेड पे |
| ०१/०१/२००६ | ९३००/- | २४००/- | ०१/०१/२००६ | ९३००/- | २५००/- |
| ०१/०७/२००६ | ९६६०/- | २४००/- | ०१/०७/२००६ | ९३००+३६०=९६६०/- | २५००/- |
| ०१/०७/२००७ | १००३०/- | २४००/- | ०१/०७/२००७ | ९६६०+३७०=१००३०/- | २५००/- |
| ०१/०७/२००८ | १०४१०/- | २४००/- | ०१/०७/२००८ | १००३०+३८०=१०४१०/- | २५००/- |
| पोलीस हवालदार/श्री.ढाके यांची दि.२६/०८/२००८ पासून पोस्टे.घाटंजी(नक्षलग्रस्त) येथे ए.ट.प.पदी (सपोउपनि पदी) **वेतनसंरचना ५२००-२०२०० ग्रेड पे २८००/-मध्ये** नेमणूक | | | | | |
| २६/०८/२००८ | १०४१०+३९०=१०८००/- | २८००/- | २६/०८/२००८ | १०४१०+३९०=१०८००/- | २८००/- |
| दि.०२/०९/२००८ पासून सहायक पोलीस उप निरीक्षक पदी **वेतनसंरचना ५२००-२०२०० ग्रेड पे २८००/-मध्ये नियमित पदोन्नती.** तथापी पोस्टे.घाटंजी (नक्षलग्रस्त) येथे कार्यरत असल्याने ए.ट.प.पदी (पोलीस उप निरीक्षक पदी) **वेतनसंरचना ९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/-मध्ये वेतन देय.** | | | | | |
| ०२/०९/२००८ | १०८००+४१०=११२१०/- | ४३००/- | ०२/०९/२००८ | १०८००+४१०=११२१०/- | ४३००/- |
| ०१/०७/२००९ | ११६८०/- | ४३००/- | ०१/०७/२००९ | ११६८०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१० | १२१६०/- | ४३००/- | ०१/०७/२०१० | १२१६०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०११ | १२६६०/- | ४३००/- | ०१/०७/२०११ | १२६६०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१२ | १३१७०/- | २८००/- | ०१/०७/२०१२ | १३१७०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१३ | १३६५०/- | २८००/- | ०१/०७/२०१३ | १३७००/- | ४३००/- |
| सहायक पोलीस उप निरीक्षक ते पोलीस उप निरीक्षक पदी **वेतनसंरचना ९३००-३४८०० ग्रेड पे ४३००/-मध्ये** दि.०१/१०/२०१३ पासून **नियमित पदोन्नती.** तथापी पोस्टे.घाटंजी (नक्षलग्रस्त) येथे कार्यरत असल्याने ए.ट.प.पदी (सहायक पोलीस निरीक्षक पदी) **वेतनसंरचना ९३००-३४८०० ग्रेड पे ४४००/-मध्ये वेतन देय.** | | | | | |
| ०१/१०/२०१३ | १३६५०/- | २८००/- | ०१/१०/२०१३ | १३७००+५४०=१४२४०/- | ४४००/- |
| **दि.३१/०५/२०१४ म.नं.पासून नक्षलग्रस्त भागातून मूळ घटकात (पोलीस उप निरीक्षक या मूळ पदात) परत आले.** | | | | | |

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/३०/३३/वेतनश्रेणी-प्र.अ./१०७२०१२, दि.१२/१०/२०१७ अन्वये सदर कर्मचारी यांना पदोन्नतीचे वेतननिश्चितीचा लाभ दि.०१/०१/२००६ ते ३१/०३/२००९ या कालावधीतील अनुज्ञेय थकबाकी एकरकमी संबंधितांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावी. तसेच दि.०१/०४/२००९ पासून वेतनाचे प्रत्यक्ष लाभ देण्यात यावे.

( एम. राज कुमार )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ.

# भाग 4 - बक्षिस / मानधन

निरंक

# भाग 5-शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

- 6 NOV 2018

क्रमांक :- डीपी/३१-बी-२/पो.नि. शुक्ला/अपिल अर्ज/ 14349 /२०१८ यवतमाळ दि.

**संदर्भ :-** **पोमस यांचे आदेश क्र.-**
पोमसं/११/२२/६/३६/२०१७ मुंबई, दिनांक -२५/१०/२०१८.

**विषय :-** अपील आदेश तामील होणेबाबत.

उपरोक्त संदर्भान्कीत विषयान्वये सादर करण्यात येते की, मा. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी अपील आदेश तामील करीता पाठविण्यात आले आहे. प्रत प्राप्त करुन दुय्यम प्रतीवर **दिनांकीत स्वाक्षरीसह दुय्यम प्रत या कार्यालयाचे मार्फतीने** मा.पो.महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालयास त्वरीत सादर करावी.

सहपत्र :- अपील आदेश-०२ प्रति

(अनिलसिंह गौतम)
पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

दुसरा प्रत

क्र. पोमसं/११/२२/६/३६/२०१७ मुंबई, दिनांक:-२५/१०/२०१८

**संदर्भ :-** १. पोउपमनि,गडचिरोली परिक्षेत्र यांचे अंतिम आदेश क्र.गपग/डी-/विचौ/पोनि-शुक्ला/२०१६/३०८०, दि.२७/०९/२०१६, व

२. पोलीस निरीक्षक दिनेश शुक्ला यांचा दि.२७/१०/२०१६ चा अपिल अर्ज.

**-: अपील आदेश :-**

पोलीस निरीक्षक दिनेश शुक्ला (सध्या ने. यवतमाळ) हे गोंदिया शहर पोलीस ठाणे, जि.गोंदिया येथे कार्यरत असतांना त्यांनी खालीलप्रमाणे कसुरी केलेली आहे :-

**कसुरी :-**

दि.३०/०५/२०१६ रोजी फिर्यादी मोहनलाल अर्जुनभाई पटेल हे त्यांच्या नवविवाहीत गर्भवती मुलीस तिच्या सासरच्या लोकांनी जिवंत जाळून मारल्याबाबत तक्रार देण्याकरीता पोलीस ठाणे गोंदिया शहर येथे आले असता फिर्यादीने कथन केलेल्या घटनाक्रमानुसार कलम १५४ (१) सी.आर.पी.सी.नुसार फिर्याद नोंदविली नाही. याउलट "दहेज के लिए मेरे लडकी से मारपीट करने के कारण मेरे लडकी ने खुदखुशी की" अशा आशयाचा अर्ज पोलीस ठाण्यातील संगणकावर टंकलिखीत करण्यास प्रोत्साहीत केले.

सदर प्रकरणी सादर करण्यात येते की, पोस्टे गोंदिया शहर येथे दि.३०/०५/२०१६ रोजी फिर्यादी मोहनलाल अर्जुनभाई पटेल हे त्यांच्या मुलीस सासरच्या लोकांनी जाळून मारल्याबाबत फिर्याद देण्याकरीता आले असता पोनि शुक्ला यांनी फिर्यादीचे स्वरुप बदलण्यास फिर्यादीस प्रोत्साहित केल्याबाबत पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली यांचेकडून करण्यात आलेल्या चौकशीमध्ये उपरोक्त कसुरी दिसून येत असल्यामुळे उक्त कसुरीच्या अनुषंगाने ज्ञाप क्र. गपग/डी-५/अपिल/पोनि शुक्ला/१६-२४६१, दि.१६/०७/२०१६ अन्वये पोनि शुक्ला यांना उपरोक्त कसुरीसाठी या **"पुढील देय होणारी एक वार्षिक वेतनवाढ ०२ (दोन)वर्षाकरिता (अपरिणामकारक) स्थगित का करण्यात येऊ नये "** अशी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीस पोनि शुक्ला यांना दि.३०/०७/२०१६ रोजी अदा झाली असून त्यावर त्यांनी दि.१०/०८/२०१६ रोजी स्पष्टीकरण सादर केले आहे.

पोनि शुक्ला यांनी सादर केलेल्या कारणे दाखवा नोटीसवर सादर केलेल्या स्पष्टीकरणाचा तसेच समक्ष कथनातील बचावाच्या निवेदनाचा बारकाईने अभ्यास केला असता त्यांनी चौकशीत निष्पन्न झालेल्या कसुरीबाबत पुराव्यानिशी आरोपांचे खंडण केले नाही. त्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेली शिक्षा **कायम** करुन पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर यांचे आदेश क्र.गपग/डी-५/ विचौ/पोनि शुक्ला/२०१६-३०८०, दि.२७/०९/२०१६ नुसार उपरोक्त कसुरीबद्दल **"पुढील देय होणारी एक वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरिता (अपरिणामकारक) स्थगित करणे"** ही शिक्षा दिली आहे.

सदर आदेशाविरुध्द पोलीस निरीक्षक शुक्ला यांनी दि.२७/१०/२०१६ अन्वये पोलीस महासंचालक कार्यालयाकडे अपिल अर्ज सादर केला असून, अपिल अर्जात मांडलेले मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :-

आम्ही पोलीस निरीक्षक या पदावर गोंदिया जिल्हयाचे आस्थापनेवर पोलीस ठाणे गोंदिया शहर येथे ठाणेदार म्हणून सध्या कार्यरत आहोत. दि.३०/०५/२०१६ रोजी फिर्यादी मोहनलाल अर्जुनभाई पटेल रा.गोंदिया हे त्यांचे नवविवाहित गर्भवती मुलीला तिच्या सासरच्या लोकांनी जिवंत जाळून मारल्याबाबत तक्रार देण्याकरीता पोलीस स्टेशन गोंदिया शहर येथे आले असता आम्ही फिर्यादीने कथन केलेल्या घटनाक्रमानुसार कलम १५४(१) जा.फौ.प्रमाणे फिर्याद नोंदविली नाही. याउलट आम्ही दहेजच्या कारणामुळे माझे मुलीला

सासरच्या लोकांनी मारपीट केल्यामुळे माझ्या मुलीने आत्महत्या केली, अशा आशयाचा अर्ज पोलीस ठाण्यातील संगणकावर टंकलिखीत करण्यास प्रोत्साहीत केल्याबाबत त्यांच्यावर आरोप निश्चीत करुन उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये त्यांची पुढील देय होणारी एक वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरीता स्थगीत करण्यात आली आहे. आम्हास देय केलेल्या प्रस्तृत शिक्षेने आम्ही व्यथित झालो असून सदरची शिक्षा माफ होण्यास आमचे विनंतीवजा स्पष्टकरण सादर करीत आहोत.

दि.२९.०५.२०१६ रोजी ठाणे अंमलदार पोहवा, घनश्याम लिल्हारे ब.क्र.४७१ यांनी सौ.भुमीका आकाश पुरोहित, वय २२ वर्ष रा.गौशाला वार्ड गोंदिया हिला १०० टक्के जळालेल्या स्थितीत के.टी.एस. रुग्णालय गोंदिया येथील औषधोपचाराकामी भरती करण्यात आल्याबाबतचे वैद्यकिय अधिकारी के.टी.एस. रुग्णालय गोंदिया यांचे पोलीस स्टेशनला मेमो प्राप्त झाल्याबाबत आम्हाला कळविले. त्याचप्रमाणे के.टी.एस. रुग्णालय गोंदिया येथील पोलीस चौकीमध्ये कार्यरत असलेले सफौ.कटरे ब.क्र.४८१ यांनी देखील भ्रमणध्वनीद्वारे माहिती दिल्याने घटनेचे गांभिर्य लक्षात घेवून आमचे अधिनस्त असलेले सपोनि जितेन्द्र बोरकर यांना के.टी. एस. रुग्णालय गोंदिया येथे व घटनास्थळ सर्कलचे बिट अंमलदार पोहवा गुरपुडे/१०२४ यांना घटनास्थळी गौशाळा वार्ड गोंदिया येथे व घटनास्थळ सुरक्षित ठेवण्याकरिता वेळीच रवाना करुन योग्य कायदेशिर कारवाई करण्याकरिता आदेशित केले होते.

सौ. भुमीका पुरोहित हिचे मृत्युपुर्व जबाब नोंदविण्याचे कार्यवाही करीता तिथे हजर असलेले वैद्यकीय अधिकारी यांना पत्र दिले असता वैद्यकीय अधिकारी यांनी सदहरहु महिला १०० टक्के जळाली असून बयाण देण्याचे स्थितीत नाही असे अभिप्राय देवुन तिला तात्काळ पुढील उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपूर येथे रेफर केल्याने तिचे बयाण नोंदविता आले नाही. त्यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला असुन घटनास्थळ आजूबाजुच्या लोकांना घटनेविषयी विचारपुस केली परंतु त्यांना घडलेल्या घटनेबाबत जास्त काही माहित नाही असे कळविले. सदरहु प्रकरणी करण्यात आलेल्या प्राथमिक कार्यवाहीची ठाणे दैनंदिनीला नोंद घेवून सदरचे कागदपत्र अभिलेखावर अदयावत ठेवण्यास सांगून मेडीकल कॉलेज पोलीस बुथ नागपूर आणि पोलीस ठाणे अजनी यांना यासंदर्भात दुरध्वनीद्वारे माहिती देवून सदरहु जळीत महिला रुग्णालयात उपचारार्थ भरती झाल्यावर तिचा मृत्युपुर्व जबाब घेण्याची कार्यवाही करण्याबाबत कळवावे असे सांगितले.

दि.३०/०५/२०१६ रोजी सदर जळीत महिला हिचा औषधोपचार दरम्यान मृत्यु झाल्याची पोलीस स्टेशनला माहिती प्राप्त झाली आणि त्याच दिवशी १८.३० वा. चे दरम्यान मृतक पुरोहित हिचे वडील श्री मोहनलाल पटेल हे पोलीस स्टेशनला येवुन आम्हास भेटून मी तक्रार लिहून आणली नाही असे सांगून बाहेरुन तक्रार लिहुन आणायची आहे आणि त्याच्या प्रती वरीष्ठ अधिकाऱ्यांना तसेच आमदार खासदार यांना पाठवायच्या आहेत असे म्हटले. आम्ही त्यांना बाहेरुन तक्रार लिहून आणण्यापेक्षा आपण तक्रार सांगा आम्ही संगणकावर टंकलिखीत करुन त्याची प्रिंट काढुन देतो आणि तुमच्या रिपोर्टप्रमाणे गुन्हा नोंदवून कायदेशिर कारवाई करतो. त्यावर आमचे अधिनस्त असलेले पोहवा घनशाम थेर/४८० यांना लॅपटॉप घेवुन आमचे कक्षात बोलाविले आणि सदरहु तक्रारदार हे जसे कथन करतात तशी तक्रार टंकलिखीत करत होते. संगणकावर तक्रार टंकलिखीत करती असतांना तक्रारदार हे वारंवार त्यांचे मोबाईलद्वारे कुणाचा तरी सल्ला घेत होते. त्यांचे एकंदरीत संभाषणावर ते कोणत्यातरी वकीलासोबत चर्चा करीत असल्याचे समजुन येत होते. सदरहु तक्रारदार यांचे सांगण्याप्रमाणे आमचे अधिनस्त पोहवा घनशाम थेर/४८० हे संगणकावर तक्रार टंकलिखीत करीत असतानाच अचानक तक्रारदार यांनी " यह तक्रार मेरे वकील को दिखाकर वकील के पास से रिपोर्ट लिखवाकर जल्दी वापस आता हु." असे बोलुन अर्धवट तक्रारची प्रींट घेवुन पोलीस स्टेशन मधुन निघुन गेले. बऱ्याच वेळापर्यंत वाट पाहिली परंतु ते पोलीस स्टेशनला आले नाही. त्यानंतर आम्ही कार्यालयीन

कामात व्यस्त झाल्याने तसेच तक्रारदार हे रिपोर्ट घेवुन येतील म्हणून आश्वस्त राहून ठाणे दैनंदिनीला नोंद घेतली नाही.

दि.३१/०५/२०१६ रोजी सदरहु तक्रारदार हे लेखी रिपोर्ट घेवुन पोलीस स्टेशनला आले व रिपोर्ट तयार करण्यास खुप जास्त वेळ झाल्याने येवु शकलो नाही असे सांगितले. त्यांनी लिहुन आणलेल्या लेखी रिपोर्टचे अवलोकन करुन आम्ही स्वत: अपराध क्र.१०५/२०१६ कलम ४९८ (अ) ३०२, ३४ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद दाखल केला. सदर गुन्हा तपासाकरीता सपोनि जितेन्द्र बोरकर यांचेकडे देवुन त्यांना आरोपीला अटक करण्यास सहाय केले तसेच दाखल गुन्हयाबाबत वरिष्ठांना माहिती देवून कळविले.

प्रस्तुत प्रकरणी आम्ही फिर्यादी श्री मोहनलाल अर्जुनभाई पटेल, यांनी तक्रार देतांना त्यांचेवर कोणत्याही प्रकारचे दडपण आणले नाही किंवा त्यांना आमचे मतानुसार तक्रार देण्यास प्रोत्साहित केले नसुन सदरहु तक्रारदार हे पोलीस स्टेशनमध्ये रिपोर्ट देण्यास आले होते. तेव्हा मुलीचे जळून झालेल्या मृत्युमुळे कमालीचे दु:खात असल्याने त्यांचे मन अस्थिर होते आणि त्यांना घडलेल्या प्रकरणाबाबत व्यवस्थित सांगता येत नव्हते. तसेच त्यांची मनस्थिती गोंधळल्यासारखी झाली होती. त्यांची मनस्थिती पाहुन आम्ही त्यांना धिर देवुन त्यांच्याशी आपुलकीने वागुन त्यांना बोलके करुन त्यांचे सांगण्यानुसार संगणकावर टंकलिखीत करुन रिपोर्ट तयार करीत होतो. परंतु गोंधळलेल्या मनस्थितीत त्यांना सदरहु प्रकरणी त्यांच्या वकीलाचा सल्ला घेवून त्याप्रमाणे रिपोर्ट देणे अधिक योग्य वाटले असावे म्हणून ते वारंवार मोबाईलवर संपर्क करुन त्याप्रमाणे तक्रार सांगत होतो आणि काही वेळातच त्यांनी त्यांचे वकीलांकडुन रिपोर्ट लिहुन आणतो असे सांगुन निघुन गेले होते. सदरहु तक्रारदाराची तक्रार नोंदविताना आम्ही कोणताही हलगर्जीपणा व बेजवाबदारपणा केला नसुन फिर्यादीचे मनात संशय निर्माण होईल व बेजबाबदारपणा केला नाही. उलट प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून कोणताही विलंब न करता वेळीच कायदेशिररित्या योग्य कार्यवाही करण्यात आली आहे. आम्ही आपले कर्तव्याप्रती कर्तव्यपरायणता ठेवून वरिष्ठांचे मार्गदर्शन व निर्देशानुसार प्रत्येक कामकाज कायदेशीर व योग्यरित्या पाडण्यास निरंतर प्रयत्नशिल आहोत.

आम्ही फिर्यादीने कथन केलेल्या घटनाक्रमानुसार कलम १५४(ड) जा.फौ. प्रमाणे फिर्याद नोंदविली नाही. याउलट आम्ही याउलट आम्ही दहेजच्या कारणामुळे फिर्यादीचे मुलीला सासरच्या लोकांनी मारपीठ केल्यामुळे त्यांचे मुलीने आत्महत्या केली, अशा आशयाचा अर्ज पोलीस ठाण्यातील संगणकावर टंकलिखीत करण्यास प्रोत्साहीत केल्याबाबतचे आमचेवर आरोप निश्चित करुन कायम करण्यात आलेला वेतनवाढ स्थगीतीच्या गंभीर शिक्षेमुळे आम्ही व्यथीत झालो असुन सदर शिक्षेचा आमचे मनावर प्रतिकुल परिणाम होवुन मानसिकदृष्टया मनोबल खचुन आमचे भविष्यकालीन अपेक्षित उज्वल कामगीरीच्या पथावर देखील मोठा अडसर ठरेल.

करीता मा.महोदयास बिनंती आहे की, आमचेविरुध्द कायम करण्यात आलेल्या वेतनवाढ स्थगीतीच्या शिक्षेचा फेरविचार होवुन प्रस्तुत प्रकरणी आम्ही उपरोक्तप्रमाणे विशद केलेली बस्तुस्थिती/परिस्थिती लक्षात घेवुन सदरची शिक्षा माफ होण्यास नम्र विनंती आहे.

सदर प्रकरणी पोलीस निरीक्षक दिनेश शुक्ला यांच्या अपिल अर्जासोबतच्या कागदपत्राची पडताळणी केली असता, त्यांनी अपिल अर्जात नमूद केलेले मुद्दे असमाधानकारक/अस्विकाराहार्य आहेत. त्यांनी फिर्यादीची तक्रार घेवून त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक असताना, दिलेल्या तक्रारीचे स्वरुप बदलविण्यास प्रोत्साहित करुन बेजबाबदारपणा केला आहे. तसेच त्यांनी CRPC १५४ प्रमाणे फिर्याद लिहून घेतली नाही. त्यामुळे तक्रारदार यांना पोनि शुक्ला यांच्याविरुध्द वरिष्ठांना अर्ज सादर करावा लागला. ही बाब

विचारात घेता पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र यांनी संदर्भ क्र.१ च्या आदेशांन्वये दिलेली "पुढील देय होणारी एक वार्षिक वेतनवाढ ०२ (दोन) वर्षाकरिता स्थगित करणे" ही शिक्षा त्यांच्या कसुरीच्या प्रमाणात योग्य असल्याचे माझे मत झाल्याने मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

-: **अपिल आदेश** :-

मी, डॉ. प्रज्ञा सरवदे, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई, याव्दारे अपिलार्थी पोलीस निरीक्षक दिनेश शुक्ला यांचा अपिल अर्ज याद्वारे फेटाळत आहे.

२. अपिलार्थी पोलीस निरीक्षक दिनेश शुक्ला हे सदर निर्णयाने व्यथित होत असतील तर, ते अपिल आदेश मिळालेल्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आंत योग्य मार्फतीने शासनास फेरतपासणी अर्ज सादर करु शकतात.

**( डॉ.प्रज्ञा सरवदे )**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

क्रमांकःडोपी/३१-बी/मपोशि-१८८७/निलंबन/ १८३३०/२०१८ यवतमाळ दिनांक - 07 NOV 2018

## निलंबन आदेश

मपोशि/१८८७ प्रतिभा मडावी, नेमणुक पो.स्टे.वडगांव जगंल आपण पो.स्टे. अवधुतवाडी येथील अपराधामधील अटक आरोपी हे पो.स्टे.यवतमाळ शहरच्या लॉकअप मध्ये ठेवण्यात आले असतांना आपण दिनांक ३१/१०/२०१८ रोजी सकाळी ०९.०० वा.दरम्यान पो.स्टे.यवतमाळ शहर येथे येवुन पहा-यावर असलेले संत्री यांना आरोपी नामे शैलेश गाडेकर हा नातेवाईक असुन त्यास भेटावयाचे आहे असे सांगुन आरोपी सोबत संभाषण केले. व आरोपीस हवालातमध्ये बंद असतांना सुध्दा मोबाईलद्वारे संभाषण करुन दिले ही बाब अतिशय गंभीर असुन आपले हे कृत्य शासकीय गुपिते अधिनीयम १९२३ च्या कायद्याचे उल्लंघन करणारे आहे. आपण पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना आपले कृत्य हे जनमानसात पोलीस खाल्याची प्रतिमा मलीन करणारे व शिस्तप्रीय खात्याला न शोभनारे आहे. ही बाब पोलीस खात्यास अशोभनीय असुन गैरवर्तणुकी बाबत मला प्राप्त अधिकारान्वये चौकशीचे अधिन आदेश दिनांक पासुन तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात येत आहे.

२ निलंबन काळात आपले मुख्यालय, पोलीस मुख्यालय यवतमाळ हे निश्चीत करण्यात येत आहे. आपले निलंबन काळात आपण पोलीस उपअधिक्षक मुख्यालय यवतमाळ हयांचे पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडु नये. या निश्चीत केलेल्या मुख्यालयात आपण दररोज न चुकता हजेरी द्यावी.

३. निलंबन काळात आपणांस निर्वाह भत्ता अस्तीत्वात असलेल्या नियमाप्रमाणे देण्यात येईल. आपण दर महिन्याला निर्वाह भत्ता घेण्यापुर्वी अगोदरच्या महिन्यात (ज्या महिन्याचा त्यांना निर्वाह भत्ता घ्यावयाचा आहे तो महिना) आपण कोणतीही खाजगी नोकरी अथवा कोणताही खाजगी व्यवसाय/ उद्योग केलेला नाही त्याबद्दलचे प्रमाणपत्र द्यावे लागेल.

४. आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळातही आपण पोलीस कर्मचारी म्हणुन राहाल निलंबित नसतांना जी जबाबदारी शिस्त व शिक्षा आपणांस लागु होत्या त्याच त्यानां आताही लागु राहतील. फक्त आपले अधिकार कार्य व विशेष सुविधा निलंबन काळात तात्पुरते तहकुब राहतील.

५. पुढे आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळात कोणतीही खाजगी नोकरी अथवा व्यवसाय/ उद्योग करण्याची आपणांस परवानगी नाही. जर आपण आपले निलंबन काळात खाजगी नोकरी अथवा खाजगी व्यवसाय/उद्योग केला तर ही गैरवर्तणुक ठरेल व त्याबद्दल आपले विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकरणात आपला निर्वाह भत्त्यावर अधिकार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**( एम.राज कुमार )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रतिः-** मपोशि/१८८७ प्रतिभा मडावी, नेमणुक पो.स्टे.वडगांव जंगल

# भाग 6 - प्रशिक्षण व इतर

अतितात्काळ/कालमर्यादा

14345

क्र.प्रलि/८०-सी/प्रशिक्षण/डीएसबी कोर्स-१/एमआयए-पुणे/ /२०१८ यवतमाळ, दिनांक-०६/११/२०१८

**आदेश**

- 6 NOV 2018

मा.संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र इन्टेलिजन्स ॲकेडमी, पुणे यांचे बिनतारी संदेश क्र. MIA/TRG/DSB-०१/२०१८/१९०८, पुणे, दिनांक २९.१०.२०१८ अन्वये *महाराष्ट्र इंन्टेलिजंन्स ॲकेडमी, एस.आर.पी.एफ.ग्रुप- १ कॅम्पस, रामटेकडी, हडसपर, पुणे येथे* **दिनांक १३.११.२०१८ ते १७.११.२०१८ या कालावधीत जिल्हा विशेष शाखेतील पोलीस अधिकारी यांचेकरिता** ***D.S.B.COURSE*** आयोजीत करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणाकरिता **पोलीस निरीक्षक/संजय मनोहर शिरभाते, नेमणूक जिल्हा विशेष शाखा, जि.यवतमाळ** यांची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार पोनि/श्री.शिरभाते यांनी दि.१२/११/२०१८ रोजी २०.०० वाजेपर्यंत *महाराष्ट्र इंन्टेलिजंन्स ॲकेडमी, एस.आर.पी.एफ.ग्रुप- १ कॅम्पस, रामटेकडी, हडसपर, पुणे येथे* प्रशिक्षणाचे ठिकाणी न चुकता हजर राहावे. प्रशिक्षणास रवाना झाल्याबाबत व प्रशिक्षण पुर्ण करुन आल्याबाबत या कार्यालयास कळवावे. सदर प्रशिक्षण हे साध्या गणवेषात असुन, प्रशिक्षणास जातेवेळी **रोखपाल पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांचेकडून रु. १४००/- (अक्षरी रुपये एक हजार चारशे फक्त)** प्रशिक्षण निधी तसेच ओळखपत्र, पेन ड्राईव्ह, स्पोर्ट ड्रेस, स्पोर्ट शुज, रिलीव्हींग मेमो सोबत घेवुन जावे.

**(पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये )**

**( अनिलसिंह गौतम )**
प्र.पोलीस उप अधीक्षक (मुख्या.)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करिता.

## बिनतारी संदेश

प्रति - ठाणेदार, पो.स्टे.अवधुतवाडी/यवतमाळ शहर/आर्णी/दिग्रस(.)

माहितीस :- उविपोअ-यवतमाळ/दारव्हा

पासुन - पोलीस अधीक्षक, यवतमाळ (.)

क्र. प्रलि/८०-सी/सेवांतर्गत प्रशिक्षण /१००(१)/२०१८ यवतमाळ, दिनांक-०६.११.२०१८

**परिक्षेत्रीय सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत दिनांक १२.११.२०१८ ते १३.११.२०१८** या कालावधीत **प्रतिबंधक कारवाई** या विषयावरील प्रशिक्षण **सी.सी.टी.एन.एस हॉल पोलिस मुख्यालय, यवतमाळ** येथे आयोजीत करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणाकरीता खालील नमुद पोलीस अधिकारी यांची निवड करण्यात येत असुन त्यांनी साध्या गणवेषात प्रशिक्षणाचे सर्व तयारीनिशी **दिनांक १२.११.२०१८ रोजी सकाळी ०९-०० वा. पावेतो पोलिस मुख्यालय, यवतमाळ येथे** न चुकता हजर राहावे(.) त्याचप्रमाणे निवडण्यात आलेले पोलीस अधिकारी यांना कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षणाकरीता पाठवू /हजर राहू शकत नसल्यास त्यांचेऐवजी संबंधित प्रभारी अधिकारी यांनी त्याच पोलीस स्टेशनमधील अन्य अधिकारी यांना प्रशिक्षणाकरिता पाठवावे (.)

| अ.क्र. | पो.अधिकारी यांचे नांव व पदनाम | नेमणुक | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १ | पोउपनि/ज्ञानेश्वर धावळे | पोस्टे.अवधुतवाडी | 8108057700 |
| २ | पोउपनि/आशिष बेतल | पोस्टे.यवतमाळ शहर | 9284294538 |
| ३ | पोउपनि/गणेश हिरुळकर | पोस्टे.आर्णी | 9284223399 |
| ४ | पोउपनि/वनदेव कापडे | पोस्टे.दिग्रस | 7350958970 |
| ५ | पोउपनि/निलेश शेळके | स्थागुशाखा | 9922665001 |
| ६ | पोउपनि/विजय ढाके | नियंत्रण कक्ष | 9403607237 |

**( अनिलसिंह गौतम )**
प्र.पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करिता.

१५३५।

क्रमांक-पोअय/प्रलि/८०-सी/प्रशिक्षण-कार्यशाळा-सीपीआर-पुणे/ /१८ यवतमाळ, दिनांक - ०६.११.२०१८

- 6 NOV 2018

## आदेश

क्राईम, पुणे यांचेकडील बिनतारी संदेश दिनांक ०१/११/२०१८ अन्वये, दिनांक १३.११.२०१८ ते १५.११.२०१८ या कालावधीत सेंन्टर फॉर पोलीस रिसर्च, पुणे (पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामिण कार्यालयासमोर) येथे " **SEXUAL ASSAULT ON WOMEN** " या विषयावरील ०३ दिवसीय कार्यशाळा आयोजीत करण्यात आलेली आहे.

वरील नमूद कार्यशाळेकरिता या आस्थापनेवरुन सहायक पोलीस निरीक्षक/विजया दावलु पंधरे, नेमणूक महिला सुरक्षा कक्ष, जि.यवतमाळ यांची निवड करण्यात आलेली आहे. तरी सपोनि/विजया पंधरे यांनी दि.१३/११/२०१८ रोजी सकाळी ०९.०० वाजता पावेतो सेंन्टर फॉर पोलीस रिसर्च, पुणे (पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामिण कार्यालयासमोर) येथे न चुकता हजर राहावे. प्रशिक्षणास रवाना झाल्याबाबत व प्रशिक्षण पुर्ण करुन आल्याबाबत या कार्यालयास कळवावे. तसेच सदर प्रशिक्षणास जातेवेळी सोबत रु. ६०००/- (**अक्षरी रुपये सहा हजार फक्त** ) प्रशिक्षण फी रोखपाल, पो.मु.यवतमाळ यांचेकडून घेऊन जावे. आपण सदर प्रशिक्षणास रवाना झाल्याबाबत तसेच प्रशिक्षण पुर्ण करुन परत आल्याबाबत दिनांक व वेळ या कार्यालयास न चुकता कळवावी.

**( मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये)**

( अनिलसिंह गौतम )
प्र.पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करिता.

<u>बिनतारी संदेश</u>

प्रति - ठाणेदार, पो.स्टे.अवधुतवाडी/यवतमाळ शहर/आर्णी/दिग्रस(.)

माहितीस :- उविपोअ-यवतमाळ/दारव्हा

पासुन - पोलीस अधीक्षक, यवतमाळ (.)

क्र. प्रलि/८०-सी/सेवांतर्गत प्रशिक्षण /१००(१)/२०१८ यवतमाळ, दिनांक-०६.११.२०१८

**परिक्षेत्रीय सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत दिनांक १२.११.२०१८ ते १३.११.२०१८** या कालावधीत **प्रतिबंधक कारवाई** या विषयावरील प्रशिक्षण **<u>सी.सी.टी.एन.एस हॉल पोलिस मुख्यालय, यवतमाळ</u>** येथे आयोजीत करण्यात आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणाकरीता खालील नमुद पोलीस अधिकारी यांची निवड करण्यात येत असुन त्यांनी साध्या गणवेषात प्रशिक्षणाचे सर्व तयारीनिशी **दिनांक १२.११.२०१८ रोजी सकाळी ०९-०० वा. पावेतो <u>पोलिस मुख्यालय, यवतमाळ</u> येथे** न चुकता हजर राहावे(.) त्याचप्रमाणे निवडण्यात आलेले पोलीस अधिकारी यांना कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षणाकरीता पाठवू /हजर राहू शकत नसल्यास त्यांचेऐवजी संबंधित प्रभारी अधिकारी यांनी त्याच पोलीस स्टेशनमधील अन्य अधिकारी यांना प्रशिक्षणाकरिता पाठवावे (.)

| **अ.क्र.** | **पो.अधिकारी यांचे नांव व पदनाम** | **नेमणुक** | **मोबाईल नंबर** |
|---|---|---|---|
| १ | पोउपनि/ज्ञानेश्वर धावळे | पोस्टे.अवधुतवाडी | **8108057700** |
| २ | पोउपनि/आशिष बेतल | पोस्टे.यवतमाळ शहर | **9284294538** |
| ३ | पोउपनि/गणेश हिरुळकर | पोस्टे.आर्णी | **9284223399** |
| ४ | पोउपनि/वनदेव कापडे | पोस्टे.दिग्रस | **7350958970** |
| ५ | पोउपनि/निलेश शेळके | स्थागुशाखा | **9922665001** |
| ६ | पोउपनि/विजय ढाके | नियंत्रण कक्ष | **9403607237** |

**( अनिलसिंह गौतम )**
प्र.पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करिता.

# —— समाप्त ——